सं.फौ.ख.क्र. १०५९/२०२३
शासन विरुध्द गणेश
नि.क्र.१२ खाली

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२**

मी देवाची शपथ खरे सांगतो की,
माझे नाव – राजेंद्र पांडुरंग क्षीरसागर ,
वय वर्षे - ५८, कामधंदा - नोकरी, शेती उत्पन्न बाजार समिती,
राहणार – केंजळ, तालुका वाई, जिल्हा सातारा.

**सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती सुळ -**

मी शेती उत्पन्न बाजार समिती वाई येथे सन १९९७ पासुन कार्यरत आहे.सन २०२१ पासुन मी तेथे प्रभारी सचिव म्हणुन कार्यरत आहे. माझ्या कामाची वेळ सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३० अशी आहे. दिनांक ०४.०५.२०२३ रोजी मला आमचे लिपिक चेतन प्रकाश पिसाळ यांचा फोन आला की, दिनांक ०३.०५.२०२३ रोजी सायंकाळी ७.३० वाजता कार्यालयाच्या दक्षिण बाजुला आरोपी गणेश यांनी अतिक्रमण करुन तार कंपांऊड तोडुन तेथे त्याच्या पानटपरीकडे जाण्यासाठी रस्ता केला आहे. त्यानंतर मी घटनास्थळी भेट दिली. त्या ठिकााणी मला असे दिसुन आले की आरोपीने तार तोडुन रस्ता केला आहे. सदरचा रस्ता हा बाजार समितीच्या हद्दीतुन होता. पाहणी केल्यानंतर मी सदरची बाब आमच्या प्रशासकांना सांगितली. त्यांनी मला त्याबाबत पोलीसात तक्रार देण्याकरिता सांगितले. त्याप्रमाणे मी दिनांक ०६.५.२०२३ रोजी घटनेची फिर्याद पोलीसात दिली. आता मला सदरची फिर्याद दाखवण्यात आली. त्यावरमाझी सही असुन मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.२८** देण्यात येते. आता मला छापील एफ. आय. आर. दाखवण्यात आली. त्यावर देखील माझी सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.२९** देण्यात येते. त्यानंतर दिनांक ०७.५.२०२३ रोजी पोलीस घटनास्थळी आले होते. त्यांनी तेथे पंचनामा कार्यवाही केली होती. त्यावेळी मी त्यांना घटनास्थळावरील परिस्थीती दाखवली. तसेच त्यानुसार मी सही सुध्दा केली होती. मी आरोपीस ओळखतो. तो आजरोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस.डी.खामकर</u> -**

२. सन १९८१ साली वाई येथे कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना झाली. हे

म्हणणे खरे आहे की तत्पुर्वी त्या ठिकाणी शेतजमीनी होत्या. हे म्हणणे खरे आहे की, त्या करिता कशाप्रकार भुसंपादन झाले या बाबतची व्यक्तीगत माहीती मला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरील बाजार समितीच्या दक्षिण दिशेला लागुन आजही शेतजमीनी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्या शेत जमीनी सावंत कुटुंबियांच्या असुन आजही ते तेथे शेती करतात. हे म्हणणे खरे आहे की, समितीच्या पुर्वेस व पश्चिमेस तसेच सावंतांच्या जमीनीच्या पुर्वेस व पश्चिमेस ओढे होते. हे म्हणणे खरे आहे की, शेतजमीनीला जाण्याकरिता पुर्वापार बांध व रस्ते असतात. हे म्हणणे खरे नाही की, बाजार समितीच्या दक्षिणेस असलेल्या शेतजमीनीकडे जाण्याकरिता कोणताही बांध अथवा सरबांध नाही. साक्षीदार सांगतो की बाजार समितीच्या पुर्वेस असलेले ओढे कालांतराने पाईप टाकुन मुजवले व त्यावरुन रस्ता करण्यात आला. सदरचा रस्ता हा लगतच्या शेतमिळकत धारकांसाठी करण्यात आला होता.

३. कृषी उत्पन्न बाजार समिती वाई येथे एकुण क्षेत्रफळ २ हे ५४ आर असे आहे. सदरील जमीनीचा गट क्रमांक ७१, ७२ व ७३ असे आहेत. सदरचे संपुर्ण क्षेत्र बिगरशेती आहे. त्या संपुर्ण क्षेत्राचे ले आऊट करण्यात आले आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या लेआऊट मध्ये अंतर्गत रस्ते दर्शविण्यात आले आहेत. हे म्हणणे खरे आहे की त्या अंतर्गत रस्त्यांमध्ये पाचगणी महाबळेश्वर रस्त्यापासुन दक्षिणेकडे जाणारा अंतर्गत रस्ता देखील दाखविण्यात आला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरील रस्ता हा उत्तरेकडील रस्त्यापासुन सुरु होवुन दक्षिणेकडील शेत जमीनीकडे जावुन संपतो. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा रस्ता हा पुर्व पश्चिम रुंदीचा व उत्तर-दक्षिण लांबीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरील रस्त्या व्यतिरिक्त दक्षिणेकडील शेत जमीन धारकांना त्यांना जमीनीत जाण्याकरिता पर्यायी रस्ता उपलब्ध नाही. हे मला माहीती नाही की बाजार समितीच्या अधिका-यांशी दक्षिणेकडील लगतच्या मिळकती धारकांचे त्या रस्त्याच्या वहिवाटीवरुन पुर्वी वाद झाले होते. साक्षीदार स्वताःहुन सांगतो की त्याबाबत शेत जमीन धारकांनी तहसिलदार वाई यांच्याकडे प्रकरण दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की त्यामुळे बाजार समितीचे अधिकारी व लगतचे शेतमिळकत धारक यांच्यात न्यायालयीन वाद झाल्याबाबत मला माहीत आहे. हे म्हणणे खरे आहे की प्रस्तुतची फिर्याद दाखल करण्यापुर्वी संबंधीत कार्यालयामार्फत बाजार समिती व लगतचे शेतमिळकत धारक यांच्यात हद्द निश्चीत झाल्याचा कोणताही दस्त मी पाहिला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की,

त्यामुळे अतिक्रमण केल्याबाबत फोटो व्यतिरिक्त कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने बाजार समितीच्या जागेत अतिक्रमण केल्याचे, रस्ता काढल्याचे मी खोटे सांगत आहे.

४. मला ज्या फोनद्वारे कथीतरित्या कथीत घटनेची माहिती मिळाली होती त्याचा तपशील मी पोलीसांना फिर्याद देतेवेळी सांगितला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, चेतन पिसाळ यांनी मला फोनद्वारे कथीत घटनेची माहीती दिली असे दर्शविण्याकरिता माझ्याकडे केवळ माझ्या शब्दांव्यतिरिक्त इतर कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे चेतन पिसाळ यांनी मला फोन करुन कथीत घटनेची माहीती दिली असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या नुसार मी कथीत घटनास्थळी गेल्याचे तेथे त्या ठिकाणी मला आरोपीने तार तोडुन रस्ता केल्याचे दिसुन आल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा रस्ता हा बाजार समितीच्या हद्दीतुन जात असल्याचे व घटनेबाबत मी आमच्या प्रशासकांना माहीती दिल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, बाजार समिती वाई ते वाई पोलीस ठाणे हे अंतर पायी चालत गेल्यास १५ मिनीटांचे आहे. वाई पोलीस ठाण्यापासुन कृषी उत्पन्न बाजार समिती ही पोलीस ठाण्याच्या पुर्व दिशेला आहे. मी वाई पोलीस ठाण्यात ज्या वेळी तक्रार देण्यास गेलो ती संध्याकाळची वेळ होती. हे म्हणणे खरे नाही की, मी दिलेली कथीत तक्रार ही कार्यालयीन वेळेत दिली नव्हती. सदरची तक्रार ही तोंडी स्वरुपाची होती. आता मला निशाणी क्र.२९ वरील प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला. त्यामध्ये घटनास्थळ हे पोलीस ठाणेवाई येथुन पश्चिमेस ०.५ किमी अंतरावर असल्याचे नमुद आहे . हे म्हणणे खरे आहे की, त्यामध्ये माहीती प्राप्त झाल्याचा प्रकार लेखी असा नमुद आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी पोलीस ठाण्यात जावुन निशाणी क्र.२८ वरील तक्रार नोंदविल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखविल्याप्रमाणे घटनास्थळाचा पंचनामा पोलीसांनी केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडलीच नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, केवळ राजकीय व न्यायालयीन वादातुन मी खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, बाजार समितीतील अंतर्गत असलेल्या कोणत्याही बांधकामाला रितसर परवानगी प्राप्त करण्यात आलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, संजय तरटे या व्यक्तीचे बांधकाम कोणत्याही परवानगीशिवाय करण्यात

आलेले आहे. साक्षीदार स्वताहुन सांगतो की प्रत्यक्षात संजय तरटे यांनी तसे कोणतेही बांधकाम केलेले नसुन समितीने त्यांना त्यांच्या व्यवसायाकरिता गाळा दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, संजय तरटे यांच्याशी माझे सलोख्याचे संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपुर्ण मजकुर खोटा असुन मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

***उलटतपास पुर्ण***

***फेरतपास काही नाही.***

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE

Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2025.11.05 17:06:12 +0530

दि.०५.११.२०२५

(आर.एम. भेंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
वाई.